**Arthur Clarke**, Visionary Science Popularizer
**आर्थर क्लार्क**, द्रष्टा विज्ञानप्रसारक. A Tribute in Marathi लेखक, तत्कालीन संपादक म. ना. गोगटे (by) www.mngogate.com Attachment (acl.pdf)

= 1 =

यूसिस (USIS) मधील साहित्यिक मित्र रमेश मंत्री यांच्या सहकार्यामुळे नामवंत विज्ञानरंजन लेखक आर्थर क्लार्क व यूसिस प्रसिद्धीसंचालक मायकेल यांच्याशी बातचीत करण्याचा आम्हास काही दिवसांपूर्वी योग आला. (< संपादकीय).... मुंबई मराठी साहित्य संघ व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध विज्ञानरंजन साहित्यिक श्री आर्थर क्लार्क यांचा स्वागत समारंभ 12 फेब्रु रोजी संघ मंदिरात करण्यात आला. (< बातमी)... मार्च 1972 मराठी विज्ञान परिषद पत्रिका वरून. (अल्प बदल येथे)

= 2 =

(मार्च 1972 संपादकीयातील अन्य काही वाक्ये) 2001-ए स्पेस ओडेसी या गाजलेल्या कादंबरीचे व चित्रपटाचे श्री. क्लार्क लेखक आहेत. त्यानी आतापावेतो 40 विज्ञानरंजन पुस्तके लिहिली असून ती 30 भाषांतून अनुवादित झाली आहेत व एक कोटी प्रती विकल्या गेल्या आहेत. यावरून त्यांच्या लोकप्रियतेची कल्पना येईल. आर्थर क्लार्क यांना उत्कृष्ट विज्ञानलेखनाबद्दल 1962 चे कलिंग पारितोषिक युनेस्को संस्थेने दिले........ मानवाने चंद्रावर पाऊल टाकण्यागोदर 10 वर्षे श्री. क्लार्क यानी त्यासंबंधी रंजक कादंबरी लिहिली. तिच्यात आगामी संशोधन, यंत्रे, तंत्रे यांचे त्यानी रेखाटन केले व ते बरेचसे खरे ठरले. क्लार्क म्हणाले की विज्ञानरंजन साहित्य म्हणजे अजब कल्पनाविलास नाही. विज्ञानाची वाटचाल, विज्ञानाचे प्रकल्प यांचा सूक्ष्म अभ्यास अशा लेखकानी केला पाहिजे.

= 3 =

क्लार्क (1917- 2008) यानी निसर्ग, आरोग्य व अन्य क्षेत्रांवरही विपुल लेखन केले, विज्ञानभाकिते केली. उपग्रहविज्ञानात त्यांचे विशेष द्रष्टेपण होते.

अल्प आदरांजली June 2008 (अरुंद कंपोज)